IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# संत साहित्यातील स्त्रियांचे बंड: संत जनाबाई, कान्होपात्रा आणि इतर संत कवयित्रींचा चिकित्सक अभ्यास

**डॉ. ज्योती मधुकर इंगळे**
सहायक प्राध्यापक मराठी
वसंतराव नाईक महाविद्यालय. छत्रपती संभाजीनगर.

**सारांश**

मराठी संत साहित्य हे भारतीय भक्ती परंपरेतील अत्यंत महत्त्वाचे आणि लोकाभिमुख साहित्य मानले जाते. या साहित्याने केवळ अध्यात्मिक विचार मांडले नाहीत, तर सामाजिक परिवर्तनाची प्रक्रियाही घडवून आणली. मध्ययुगीन महाराष्ट्रातील समाजव्यवस्था ही जातीयता, पितृसत्ता, धार्मिक विषमता आणि सामाजिक असमानता यांनी व्यापलेली होती. स्त्रीला समाजात दुय्यम स्थान होते. तिच्या जीवनावर धर्म, परंपरा आणि पुरुषसत्ता यांचे कठोर नियंत्रण होते. अशा परिस्थितीत संत जनाबाई, संत कान्होपात्रा, संत सोयराबाई, संत मुक्ताबाई आणि संत बहिणाबाई यांसारख्या संत कवयित्रींनी भक्तीच्या माध्यमातून स्त्रीचे अनुभव, वेदना, आत्मसन्मान आणि सामाजिक विद्रोह व्यक्त केला.

या संत कवयित्रींच्या साहित्यामध्ये स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व, श्रमाचे मूल्य, जातीव्यवस्थेविरोध, धार्मिक समानता आणि आत्मभान यांचे प्रभावी दर्शन घडते. त्यांनी भक्तीला आत्ममुक्तीचे साधन बनवले आणि समाजातील अन्यायाविरुद्ध आपला आवाज निर्माण केला. त्यांच्या साहित्यामधील विद्रोह हा राजकीय स्वरूपाचा नसला तरी सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवर अत्यंत महत्त्वपूर्ण होता. प्रस्तुत संशोधनपत्रामध्ये संत साहित्यातील स्त्रियांच्या बंडखोर जाणिवांचा अभ्यास करण्यात आला आहे. विशेषतः संत जनाबाई आणि संत कान्होपात्रा यांच्या अभंगांच्या माध्यमातून स्त्रीवादी जाणीवा, सामाजिक प्रतिकार, आत्मसन्मान आणि भक्तीतील समानतेचे विश्लेषण करण्यात आले आहे.

मुख्य शब्द : संत साहित्य, स्त्रीवाद, भक्ती चळवळ, जनाबाई, कान्होपात्रा, वारकरी संप्रदाय, स्त्रीविद्रोह, स्त्रीमुक्ती

**प्रस्तावना**

मराठी संत साहित्य हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील एक महत्त्वपूर्ण पर्व मानले जाते. संत साहित्याने समाजातील सामान्य माणसाला आध्यात्मिकतेशी जोडले. या साहित्याने धर्माला कर्मकांडातून मुक्त करून भक्तीला लोकाभिमुख स्वरूप दिले. मध्ययुगीन काळातील समाजव्यवस्था अत्यंत विषम होती. जातिभेद, वर्णव्यवस्था, धार्मिक मक्तेदारी आणि पुरुषप्रधानता यांमुळे समाजातील अनेक घटक उपेक्षित राहिले. स्त्रियांची अवस्था विशेषतः दयनीय होती. स्त्रीला शिक्षणाचा अधिकार नव्हता. तिला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून स्वीकारले जात नव्हते. तिचे जीवन पती, कुटुंब आणि धर्म यांच्या मर्यादेतच बंदिस्त होते.

स्त्रीला धार्मिक क्षेत्रातही दुय्यम स्थान होते. अनेक धार्मिक विधींमध्ये तिला सहभाग नव्हता. खालच्या जातीतील स्त्रियांना दुहेरी शोषणाचा सामना करावा लागत होता. त्या एकीकडे जातीय व्यवस्थेच्या बळी होत्या, तर दुसरीकडे पितृसत्ताक व्यवस्थेच्या दडपशाहीखाली होत्या. अशा परिस्थितीत भक्ती चळवळीने समाजातील उपेक्षित घटकांना आवाज दिला. भक्तीमार्गाने देव प्राप्त होऊ शकतो आणि देव हा सर्वांचा आहे, हा विचार समाजात रुजला. भक्ती चळवळीमुळे स्त्रियांना स्वतःचे अनुभव आणि विचार व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ मिळाले.

संत कवयित्रींनी आपल्या अभंगांमधून स्त्रीजीवनातील दुःख, श्रम, भावविश्व, आत्मसन्मान आणि विद्रोह व्यक्त केला. त्यांनी देवाशी थेट संवाद साधला. देवाला मित्र, आई, सखा, प्रियकर अशा विविध रूपांत अनुभवले. या प्रक्रियेमध्ये त्यांनी धार्मिक मक्तेदारी आणि सामाजिक संकेतांना आव्हान दिले. संत जनाबाईंच्या अभंगांमध्ये स्त्रीच्या श्रमाचे गौरवगान दिसते. संत कान्होपात्रांच्या रचनांमध्ये देहसत्तेविरोधी विद्रोह दिसतो. संत सोयराबाईंच्या साहित्यामध्ये जातीयतेविरोधी भूमिका दिसते. संत बहिणाबाईंच्या रचनांमध्ये स्त्रीजीवनातील संघर्ष आणि अंतर्मनातील वेदना व्यक्त झालेल्या दिसतात. या संत कवयित्रींचे साहित्य हे केवळ भक्तिपर साहित्य नसून स्त्रीच्या आत्मभानाचे आणि सामाजिक प्रतिकाराचे महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे.

**संशोधनाची गरज आणि महत्त्व**

संत साहित्याचा अभ्यास प्रामुख्याने भक्ती, अध्यात्म आणि वारकरी परंपरेच्या संदर्भात झाला आहे. तथापि संत कवयित्रींच्या साहित्यामधील स्त्रीवादी जाणीवा आणि सामाजिक विद्रोह यांचा तुलनेने कमी अभ्यास झाला आहे. आजच्या स्त्रीवादी काळात संत कवयित्रींच्या साहित्याचे पुनर्मूल्यांकन करणे आवश्यक ठरते. कारण त्यांनी अनेक शतकांपूर्वीच स्त्रीच्या अस्तित्वाचा प्रश्न उपस्थित केला होता.

या संशोधनाचे महत्त्व पुढील बाबींमध्ये आहे -

१. संत साहित्यातील स्त्रीच्या अनुभवांचे विश्लेषण करता येते.

२. मध्ययुगीन स्त्रीजीवनाचे वास्तव समजते.

३. भक्ती चळवळ आणि स्त्रीमुक्ती यांचा संबंध स्पष्ट होतो.

४. स्त्रीवादी समीक्षेच्या दृष्टीने संत साहित्याचे पुनर्मूल्यांकन करता येते.

५. संत कवयित्रींच्या साहित्यामधील सामाजिक प्रतिकार समजतो.

**संशोधन समस्या**

संत कवयित्रींच्या साहित्यामध्ये व्यक्त झालेला स्त्रीविद्रोह कोणत्या स्वरूपाचा होता? भक्ती ही स्त्रियांसाठी आत्ममुक्तीचे साधन कशी ठरली? संत जनाबाई, कान्होपात्रा आणि इतर संत कवयित्रींच्या अभंगांमधून स्त्रीचे आत्मभान आणि सामाजिक प्रतिकार कशा प्रकारे व्यक्त झाले आहे? या प्रश्नांचा अभ्यास करणे ही या संशोधनाची मुख्य समस्या आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. संत साहित्यातील स्त्रियांच्या विद्रोही भूमिकेचा अभ्यास करणे.

२. संत जनाबाई आणि संत कान्होपात्रा यांच्या साहित्याचा स्त्रीवादी दृष्टिकोनातून अभ्यास करणे.

३. मध्ययुगीन समाजातील स्त्रीचे स्थान समजून घेणे.

४. भक्ती चळवळ आणि स्त्रीमुक्ती यांचा संबंध स्पष्ट करणे.

५. संत कवयित्रींच्या अभंगांमधील सामाजिक प्रतिकाराचे स्वरूप शोधणे.

**संशोधन पद्धती**

या संशोधनासाठी वर्णनात्मक, चिकित्सक आणि विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. संत साहित्य, अभंग संग्रह, संशोधनपर पुस्तके, शोधनिबंध, नियतकालिके आणि स्त्रीवादी समीक्षेच्या आधारे या विषयाचा अभ्यास करण्यात आला आहे.

**साहित्याचा आढावा**

मराठी संत साहित्यावर अनेक अभ्यासकांनी संशोधन केले आहे. संत साहित्याचा सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ लक्षात घेऊन विविध अभ्यासकांनी संत कवयित्रींच्या साहित्याचे विश्लेषण केले आहे. वि. इनामदार यांनी संत साहित्याला लोकजीवनाशी जोडले आहे. त्यांच्या मते संत साहित्य हे सामान्य माणसाच्या अनुभवांचे साहित्य आहे. शं. गो. तुळपुळे यांनी संत वाङ्‌ग्यातील सामाजिक जाणिवांचा अभ्यास केला आहे. त्यांच्या मते संत साहित्यामध्ये मानवतावाद आणि सामाजिक समानतेचा विचार आहे. डॉ. आ. ह. साळुंखे यांनी संत साहित्यामधील विद्रोही प्रवाह स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते संत साहित्य हे जातीयता आणि धार्मिक विषमतेविरोधातील सांस्कृतिक आंदोलन होते.

स्त्रीवादी समीक्षकांनी संत कवयित्रींच्या साहित्याचा पुनर्विचार केला आहे. जनाबाईंच्या अभंगांमध्ये स्त्रीच्या श्रमाचे महत्त्व, कान्होपात्रांच्या साहित्यामध्ये आत्मसन्मान आणि सोयराबाईंच्या अभंगांमध्ये दलित स्त्रीचे दुःख स्पष्टपणे दिसते. तथापि संत कवयित्रींच्या विद्रोही जाणिवांचा तुलनात्मक अभ्यास तुलनेने कमी प्रमाणात झालेला दिसतो. सैद्धांतिक चौकट या संशोधनासाठी स्त्रीवादी समीक्षा, समाजशास्त्रीय समीक्षा आणि सांस्कृतिक समीक्षा यांचा आधार घेण्यात आला आहे.

**स्त्रीवादी समीक्षा**

स्त्रीवादी समीक्षा ही साहित्यामधील स्त्रीचे स्थान, अनुभव, दडपशाही आणि प्रतिकार यांचा अभ्यास करते. संत कवयित्रींच्या साहित्यामध्ये स्त्रीचे आत्मभान आणि स्वतंत्र अस्तित्वाचा शोध दिसतो.

**समाजशास्त्रीय समीक्षा**

समाजशास्त्रीय समीक्षा साहित्य आणि समाज यांचा संबंध स्पष्ट करते. संत साहित्यामध्ये जातीयता, पितृसत्ता आणि धार्मिक विषमता यांचे प्रतिबिंब दिसते.

**सांस्कृतिक समीक्षा**

सांस्कृतिक समीक्षा साहित्यामधील सत्ता, परंपरा आणि सांस्कृतिक संकेत यांचा अभ्यास करते. संत कवयित्रींनी भक्तीच्या माध्यमातून सामाजिक आणि धार्मिक सत्तेला प्रश्न विचारले.

**मध्ययुगीन समाजव्यवस्था आणि स्त्रियांची स्थिती**

मध्ययुगीन समाजव्यवस्था ही धर्माधारित आणि पुरुषप्रधान होती. स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून स्वीकारले जात नव्हते. तिचे जीवन कुटुंबाच्या मर्यादेत बंदिस्त होते. बालविवाह, शिक्षणबंदी, विधवांवरील अन्याय आणि धार्मिक निर्बंध यांमुळे स्त्रियांचे जीवन अत्यंत कठीण झाले होते. खालच्या जातीतील स्त्रियांना दुहेरी शोषणाचा सामना करावा लागत होता. त्यांना सामाजिक अपमान, आर्थिक शोषण आणि धार्मिक बहिष्कार सहन करावा लागत होता.

अशा परिस्थितीत भक्ती चळवळ स्त्रियांसाठी आत्ममुक्तीचे माध्यम ठरली.

**भक्ती चळवळ आणि स्त्रीस्वातंत्र्य**

भक्ती चळवळीने देव आणि भक्त यांच्यातील थेट संबंधाला महत्त्व दिले.
जात, धर्म, लिंग आणि वर्ग यांच्या पलीकडे जाऊन भक्तीला महत्त्व देण्यात आले. स्त्रियांसाठी भक्ती ही आत्ममुक्तीची प्रक्रिया होती. भक्तीच्या माध्यमातून त्यांनी स्वतःचे भावविश्व आणि सामाजिक अनुभव व्यक्त केले.

**भक्ती चळवळीमुळे स्त्रियांना** -

आध्यात्मिक स्वातंत्र्य, आत्मभान, सामाजिक समानतेची जाणीव ,स्वतःचा आवाज ,धार्मिक क्षेत्रात सहभाग मिळाला.

**संत जनाबाई: श्रम, भक्ती आणि विद्रोह**

संत जनाबाई या मराठी संत साहित्यातील अत्यंत महत्त्वाच्या संत कवयित्री आहेत. त्या संत नामदेवांच्या घरी दासी म्हणून राहत होत्या. त्यांचे जीवन श्रममय होते. घरकाम, झाडलोट, दळण, धुणे, स्वयंपाक या कामांमध्ये त्यांचे आयुष्य गेले. मात्र त्यांनी या श्रमाला कमीपणा मानले नाही. उलट त्यांनी श्रमाला भक्तीचे रूप दिले. त्यांच्या अभंगांमध्ये स्त्रीचे दैनंदिन जीवन वास्तववादी पद्धतीने चित्रित झाले आहे.

त्या म्हणतात: **“झाडलोट करी जनी**
**केर भरी चक्रपाणी”**

या अभंगामध्ये विठ्ठल स्वतः झाडलोट करतो. ही कल्पना त्या काळातील सामाजिक व्यवस्थेला दिलेले मोठे आव्हान होते. कारण समाजात स्त्रीचे घरकाम कनिष्ठ मानले जात होते. जनाबाईंनी मात्र देवाला त्या श्रमांमध्ये सहभागी करून स्त्रीच्या श्रमाला प्रतिष्ठा दिली.

**जनाबाईंच्या अभंगांतील स्त्रीवादी जाणीवा**

संत जनाबाईंच्या अभंगांचा अभ्यास केला असता त्यांच्या साहित्यामध्ये स्त्रीच्या आत्मभानाचे, श्रममूल्याचे आणि सामाजिक प्रतिकाराचे प्रभावी दर्शन घडते. त्या मध्ययुगीन काळातील स्त्रीच्या जीवनातील दुःख, कष्ट आणि सामाजिक कनिष्ठता अत्यंत वास्तववादी पद्धतीने मांडतात. जनाबाईंचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी भक्ती आणि दैनंदिन जीवन यांचा अत्यंत नैसर्गिक संगम घडवून आणला. त्यांच्यासाठी भक्ती ही मंदिरापुरती मर्यादित नव्हती; ती रोजच्या श्रमांमध्येही होती.

**१. श्रमाचे गौरवगान**

जनाबाईंच्या अभंगांमधील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे त्यांनी स्त्रीच्या श्रमाला प्रतिष्ठा दिली. त्या काळात घरकामाला सामाजिक मान्यता नव्हती. स्त्रीचे काम हे तिचे कर्तव्य मानले जात होते; परंतु त्या श्रमांचे मूल्य मान्य केले जात नव्हते. जनाबाई मात्र या कामांना आध्यात्मिक मूल्य देतात. त्या म्हणतात -

**“दळिता कांडिता**
**तुज गाईन अनंता**”

या ओळींमध्ये दळणकांडणासारख्या श्रमांमध्येही भक्ती अनुभवली जाते. यातून पुढील गोष्टी स्पष्ट होतात, स्त्रीचे श्रम हे कनिष्ठ नाहीत, घरकामालाही मानवी मूल्य आहे, भक्ती आणि श्रम यांचा संबंध आहे. स्त्रीचे दैनंदिन जीवन साहित्याच्या केंद्रस्थानी येते. हे त्या काळातील पुरुषप्रधान मानसिकतेविरुद्धचे महत्त्वपूर्ण बंड होते.

**२. देवाशी समानतेचे नाते**

जनाबाईंच्या साहित्यामध्ये विठ्ठल हा केवळ पूजनीय देव नाही, तर घरातील सदस्यासारखा आहे. त्या विठ्ठलाशी रागावतात, प्रेमाने बोलतात, त्याला कामे सांगतात.

उदाहरणार्थ: **“विठू माझा लेकुरवाळा”**

या अभंगांमध्ये देव आणि भक्त यांच्यातील अंतर कमी झालेले दिसते. स्त्रीला धार्मिक क्षेत्रात दुय्यम स्थान देणाऱ्या समाजात जनाबाई देवाशी थेट संवाद साधतात. ही गोष्ट धार्मिक मक्तेदारीविरोधी आणि स्त्रीच्या आत्मविश्वासाची प्रतीकात्मक अभिव्यक्ती आहे.

**३. स्त्रीचे आत्मभान**

जनाबाईंच्या अभंगांमध्ये स्त्री स्वतःचे अनुभव निर्भयपणे व्यक्त करते. त्या स्वतःच्या दुःखाविषयी बोलतात, श्रमांविषयी बोलतात आणि स्वतःच्या अस्तित्वाची जाणीवही व्यक्त करतात. मध्ययुगीन काळात स्त्रीला स्वतःचे अनुभव सार्वजनिकपणे व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य नव्हते. त्यामुळे जनाबाईंचे साहित्य हे स्त्रीच्या आवाजाचे प्रारंभिक रूप मानले जाते.

**४. जातीव्यवस्थेविरोधी भूमिका**

जनाबाई स्वतः खालच्या सामाजिक स्तरातील होत्या. त्यांच्या अभंगांमध्ये भक्ती ही सर्वांसाठी समान आहे, हा विचार आढळतो. त्या विठ्ठलाला सर्वांचा देव मानतात. यातून जातीय व्यवस्थेविरोधातील प्रतिकार दिसून येतो.

**संत कान्होपात्रा: देहसत्तेविरोधी विद्रोह**

संत कान्होपात्रा या मराठी संत परंपरेतील अत्यंत विद्रोही संत कवयित्री मानल्या जातात. त्यांचा जन्म गणिकेच्या घरात झाला. त्यामुळे समाजाने त्यांच्याकडे तुच्छतेने पाहिले. मध्ययुगीन काळात स्त्रीचे मूल्य तिच्या देहाशी जोडले गेले होते. गणिकेला समाजात सन्मान नव्हता. अशा परिस्थितीत कान्होपात्रांनी विठ्ठलभक्तीचा मार्ग स्वीकारून सामाजिक व्यवस्थेलाच आव्हान दिले.

**कान्होपात्रांचे जीवन आणि सामाजिक संघर्ष**

कान्होपात्रा अत्यंत सुंदर होत्या. अनेक राजे आणि सरदार त्यांना आपल्या दरबारात ठेवू इच्छित होते. परंतु त्यांनी देहाधारित जीवन नाकारले. त्यांनी विठ्ठलाला आपला अंतिम आधार मानले. ही भूमिका त्या काळातील सामाजिक संकेतांविरोधातील मोठा विद्रोह होता. कारण त्या काळात स्त्रीचे अस्तित्व पुरुषांच्या नियंत्रणाखाली मानले जात होते. कान्होपात्रांनी मात्र स्वतःच्या इच्छेने भक्तीचा मार्ग स्वीकारला. कान्होपात्रांच्या अभंगांतील विद्रोही स्वर म्हणजे

**१. आत्मसन्मानाची जाणीव**

कान्होपात्रांच्या अभंगांमध्ये आत्मसन्मानाची तीव्र भावना दिसते. त्या समाजाने दिलेली “पतित” ही ओळख नाकारतात. त्या म्हणतात:

**“पतित तू पावना**
**म्हणविशी नारायणा”**

या ओळींमध्ये त्या विठ्ठलाला प्रश्न विचारतात जर तू सर्वांचा देव आहेस, तर समाजाने पतित मानलेल्या लोकांनाही स्वीकारशील का? हा प्रश्न केवळ धार्मिक नाही, तो सामाजिक व्यवस्थेलाही विचारलेला आहे.

**२. देहसत्तेविरोधी भूमिका**

कान्होपात्रांच्या साहित्यामध्ये स्त्रीला केवळ देह म्हणून पाहणाऱ्या मानसिकतेविरोधी प्रतिकार दिसतो. त्या आत्म्याच्या पवित्रतेला महत्त्व देतात. त्यांच्यासाठी भक्ती ही देहाच्या पलीकडील मुक्ती आहे.

**३. भक्तीतून आत्ममुक्ती**

कान्होपात्रांसाठी भक्ती ही सामाजिक अपमानातून बाहेर पडण्याचा मार्ग होती. त्या विठ्ठलाशी थेट संवाद साधतात. यातून स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व व्यक्त होते.

**४. सामाजिक संकेतांना आव्हान**

गणिकेची मुलगी असूनही त्यांनी संतपद प्राप्त केले. ही गोष्ट त्या काळातील जातीय आणि नैतिक संकल्पनांना मोठे आव्हान देणारी होती. त्यांचे जीवन हेच विद्रोहाचे प्रतीक बनले.

**संत मुक्ताबाई: वैचारिक विद्रोह**

संत मुक्ताबाई या संत ज्ञानेश्वरांच्या भगिनी होत्या. त्यांच्या साहित्यामध्ये वैचारिक परिपक्वता आणि आध्यात्मिक चिंतन दिसते. मुक्ताबाईंचे महत्त्व असे की त्यांनी स्त्रीच्या बौद्धिक क्षमतेचे दर्शन घडवले. त्या काळात स्त्रीला वैचारिक क्षेत्रात स्थान नव्हते. मात्र मुक्ताबाईंनी आपल्या अभंगांमधून समाजातील अज्ञान, अहंकार आणि संकुचितपणावर प्रहार केला.

**"ताटी उघडा ज्ञानेश्वरा"** एक वैचारिक प्रतीक

मुक्ताबाईंचा प्रसिद्ध अभंग:

**"ताटी उघडा ज्ञानेश्वरा"**

हा केवळ भावनिक अभंग नाही. तो समाजातील बंद मानसिकतेविरोधातील प्रतीकात्मक आवाज आहे. "ताटी" म्हणजे बंद दरवाजा. मुक्ताबाई ज्ञान, समता आणि मानवतेचे दरवाजे उघडण्याचे आवाहन करतात.

**संत सोयराबाई: दलित स्त्रीचा आवाज**

संत सोयराबाई या संत चोखामेळ्यांच्या पत्नी होत्या. त्या अस्पृश्य समाजातील स्त्री होत्या. त्यामुळे त्यांना दुहेरी शोषण सहन करावे लागले. जातीय शोषण, स्त्री म्हणून सामाजिक दडपशाही, त्यांच्या अभंगांमध्ये या वेदना अत्यंत प्रभावीपणे व्यक्त झाल्या आहेत.

**जातीयतेविरोधी भूमिका**

सोयराबाई म्हणतात: "**देहीचा विटाळ देहीच जन्मला**"

या ओळींमध्ये त्या शरीराच्या शुद्ध-अशुद्धतेच्या संकल्पनेवर प्रहार करतात. त्या म्हणतात की शरीराला जात असू शकते; परंतु आत्मा सर्वांचा समान असतो. ही भूमिका तत्कालीन ब्राह्मणवादी व्यवस्थेविरोधातील तीव्र प्रतिकार होती.

**दलित स्त्रीचे वास्तव**

सोयराबाईंच्या साहित्यामध्ये दलित स्त्रीचे दुःख दिसते. त्यांच्या अभंगांमध्ये सामाजिक बहिष्कार, अपमान आणि आत्मसन्मानाचा संघर्ष व्यक्त झाला आहे. त्यांचे साहित्य हे दलित स्त्रीच्या अनुभवांचे महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे.

**संत बहिणाबाई: स्त्रीजीवनातील अंतर्मुख संघर्ष**

संत बहिणाबाई यांच्या अभंगांमध्ये स्त्रीजीवनातील वास्तववादी अनुभव दिसतात. त्यांना संसार आणि भक्ती यांच्यात संघर्ष अनुभवावा लागला. त्यांच्या साहित्यामध्ये स्त्रीचे भावविश्व अत्यंत सूक्ष्मतेने व्यक्त झाले आहे.

**संत बहिणाबाई: स्त्रीजीवनातील अंतर्मुख संघर्ष**

संत बहिणाबाई या मराठी संत परंपरेतील अत्यंत महत्त्वाच्या संत कवयित्री आहेत. त्यांच्या साहित्यामध्ये स्त्रीजीवनातील भावनिक संघर्ष, संसारातील वेदना, भक्तीतील निष्ठा आणि आत्मिक शोध यांचे प्रभावी दर्शन घडते.

बहिणाबाईंचे जीवन हे एका सामान्य स्त्रीच्या संघर्षाचे प्रतीक होते. त्यांना संसार, पतीसत्ता, सामाजिक बंधने आणि धार्मिक निष्ठा यांच्यामध्ये संतुलन साधावे लागले. त्यांच्या अभंगांमध्ये स्त्रीचे मन अत्यंत सूक्ष्मपणे व्यक्त झाले आहे.

**बहिणाबाईंच्या साहित्यामधील स्त्रीदर्शन**

**१. संसार आणि भक्ती यांतील संघर्ष**

बहिणाबाईंच्या अभंगांमध्ये संसार आणि भक्ती यांच्यातील संघर्ष स्पष्ट दिसतो. त्या एका बाजूला गृहिणी म्हणून कर्तव्य पार पाडतात, तर दुसऱ्या बाजूला त्यांना आध्यात्मिक समाधानाची ओढ आहे. हा संघर्ष मध्ययुगीन स्त्रीच्या जीवनाचे वास्तव दर्शवतो.

**२. पतीसत्ताक व्यवस्थेतील स्त्री**

बहिणाबाईंच्या साहित्यामध्ये स्त्रीची सहनशीलता दिसते; परंतु ती पूर्ण शरणागती नाही. त्यांच्या अभंगांमध्ये अंतर्मनातील वेदना आणि मौनातील प्रतिकार जाणवतो. त्या थेट विद्रोह करत नाहीत; परंतु त्यांच्या अनुभवांमधून पुरुषप्रधान व्यवस्थेतील स्त्रीचे दुःख समोर येते.

**३. आत्मिक स्वातंत्र्याची जाणीव**

बहिणाबाई भक्तीच्या माध्यमातून आत्मिक स्वातंत्र्य शोधतात. त्यांच्यासाठी भक्ती ही केवळ धार्मिक प्रक्रिया नसून मानसिक आधार आहे.

**संत साहित्यातील स्त्रियांचे बंड:**

चिकित्सक विश्लेषण, मराठी संत साहित्यामधील स्त्रियांचे बंड हे अनेक स्तरांवर व्यक्त झालेले दिसते. हे बंड थेट राजकीय स्वरूपाचे नव्हते; परंतु सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक स्तरावर अत्यंत प्रभावी होते. संत कवयित्रींनी भक्तीच्या माध्यमातून समाजातील अन्याय, पितृसत्ता, जातीव्यवस्था आणि धार्मिक विषमता यांना प्रश्न विचारले.

**१. पितृसत्तेविरोधी प्रतिकार**

मध्ययुगीन समाजव्यवस्था पूर्णत पुरुषप्रधान होती. स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व नव्हते. संत कवयित्रींनी या व्यवस्थेविरोधात स्वतःचा आवाज निर्माण केला. जनाबाई स्वतःच्या श्रमांविषयी बोलतात. कान्होपात्रा स्वतःच्या आत्मसन्मानाविषयी बोलतात. बहिणाबाई स्त्रीच्या अंतर्मनातील वेदना व्यक्त करतात. ही सर्व उदाहरणे पितृसत्तेविरोधातील प्रतिकाराची आहेत.

**२. जातीव्यवस्थेविरोधी बंड**

संत साहित्यामधील अनेक स्त्री संत खालच्या सामाजिक स्तरातून आलेल्या होत्या.
जनाबाई, सोयराबाई यांसारख्या संत कवयित्रींनी भक्तीच्या माध्यमातून सामाजिक समानतेचा संदेश दिला. त्यांनी देव हा सर्वांचा आहे, ही भूमिका मांडली. ही भूमिका त्या काळातील जातीय व्यवस्थेविरोधातील मोठे आव्हान होती.

**३. श्रमाचे आध्यात्मिकीकरण**

जनाबाईंच्या अभंगांमध्ये स्त्रीच्या श्रमाचे गौरवगान दिसते. त्या दळण, झाडलोट, भांडी घासणे या कामांना भक्तीचे स्वरूप देतात. ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. कारण मध्ययुगीन समाजात स्त्रीच्या श्रमाला मान्यता नव्हती. जनाबाईंनी या श्रमाला आध्यात्मिक मूल्य दिले.

**४. देहसत्तेविरोधी विद्रोह**

कान्होपात्रांच्या साहित्यामध्ये स्त्रीला केवळ देह म्हणून पाहणाऱ्या मानसिकतेविरोधी प्रतिकार दिसतो. त्यांनी देहाधारित जीवन नाकारले आणि भक्तीचा मार्ग स्वीकारला. त्यांच्या जीवनातून स्त्रीच्या आत्मसन्मानाचा आणि स्वतंत्र निर्णयक्षमतेचा संदेश मिळतो.

**५. धार्मिक समानतेची जाणीव**

संत कवयित्रींनी देवाशी थेट संवाद साधून धार्मिक मक्तेदारी मोडली. त्यांनी मंदिर, कर्मकांड आणि ब्राह्मणसत्ता यांच्या पलीकडे जाऊन भक्तीला महत्त्व दिले. ही धार्मिक समानतेची संकल्पना सामाजिक समानतेशी जोडलेली होती.

**संत साहित्यातील स्त्रीवादी जाणीवा**

आधुनिक स्त्रीवाद, स्त्रीचे स्वातंत्र्य, समानता, आत्मसन्मान आणि सामाजिक न्याय यांवर भर देतो. संत कवयित्रींच्या साहित्यामध्ये या संकल्पनांचे प्रारंभिक रूप दिसते.

**१. आत्मभान**

संत कवयित्री स्वतःचे अनुभव निर्भयपणे व्यक्त करतात. त्या स्वतःच्या वेदना, संघर्ष आणि इच्छा मांडतात. हे स्त्रीच्या आत्मभानाचे लक्षण आहे.

**२. स्वतंत्र अस्तित्व**

कान्होपात्रा आणि जनाबाई यांच्या साहित्यामध्ये स्त्रीचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व दिसते. त्या स्वतःचा आध्यात्मिक मार्ग निवडतात.

**३. भावनिक स्वातंत्र्य**

संत कवयित्री देवाशी अत्यंत वैयक्तिक आणि भावनिक नाते निर्माण करतात. या नात्यामध्ये भीती नाही, आत्मीयता आहे.

**४. सामाजिक प्रतिकार**

त्यांच्या साहित्यामध्ये सामाजिक अन्यायाविरोधात स्पष्ट प्रतिकार दिसतो. हा प्रतिकार थेट राजकीय नसला तरी सांस्कृतिक पातळीवर अत्यंत प्रभावी आहे.

**भक्ती चळवळ आणि स्त्रीमुक्ती**

भक्ती चळवळीने स्त्रियांना आत्मअभिव्यक्तीचे व्यासपीठ दिले. भक्तीच्या माध्यमातून स्त्रियांनी स्वतःचे अनुभव मांडले, सामाजिक विषमतेवर प्रश्न उपस्थित केले, आत्मसन्मान व्यक्त केला, धार्मिक समानतेची मागणी केली, भक्तीमुळे स्त्रियांना मानसिक आणि आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळाले.

**संत साहित्यातील विद्रोहाच्या मर्यादा**

संत कवयित्रींच्या साहित्यामध्ये विद्रोह असला तरी त्याच्या काही मर्यादा होत्या. त्यांनी समाजव्यवस्था पूर्णतः बदलण्याची राजकीय भूमिका घेतली नाही. त्यांचा विद्रोह भक्तीच्या चौकटीत होता. अनेक वेळा त्यांनी समर्पण, सहनशीलता आणि भक्ती यांनाही महत्त्व दिले. तथापि त्या काळातील सामाजिक परिस्थिती लक्षात घेतली तर स्त्रीने स्वतःचा आवाज निर्माण करणे हीच मोठी क्रांती होती.

**संत कवयित्रींचे मराठी साहित्याला योगदान**

संत कवयित्रींचे योगदान अनेक स्तरांवर महत्त्वाचे आहे.

**१. स्त्रीअनुभवांना साहित्यिक अभिव्यक्ती**

त्यांनी स्त्रीच्या दैनंदिन जीवनाला साहित्याच्या केंद्रस्थानी आणले.

**२. लोकभाषेचा वापर**

त्यांनी साध्या मराठी भाषेत अभंग लिहिले. यामुळे साहित्य सामान्य लोकांपर्यंत पोहोचले.

**३. सामाजिक जागृती**

त्यांच्या साहित्यामुळे सामाजिक समानतेची जाणीव निर्माण झाली.

**४. भक्ती साहित्य समृद्ध केले**

त्यांनी भक्ती साहित्याला भावनिक आणि मानवी परिमाण दिले. आधुनिक काळातील संत कवयित्रींचे महत्त्व आजच्या काळातही संत कवयित्रींचे साहित्य अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण, स्त्री समानतेचा प्रश्न अजूनही महत्त्वाचा आहे, स्त्रीच्या श्रमांचे अवमूल्यन अजूनही दिसते, जातीयता आणि सामाजिक विषमता अजूनही अस्तित्वात आहेत, अशा परिस्थितीत संत कवयित्रींचे साहित्य सामाजिक न्याय आणि स्त्रीसन्मानाचा प्रेरणादायी संदेश देते.

**निष्कर्ष**

मराठी संत साहित्यामधील स्त्री संतांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. संत जनाबाई, संत कान्होपात्रा, संत सोयराबाई, संत मुक्ताबाई आणि संत बहिणाबाई यांनी भक्तीच्या माध्यमातून सामाजिक अन्याय, जातीयता, स्त्रीदास्य आणि धार्मिक विषमता यांविरुद्ध आवाज उठविला. त्यांच्या साहित्यामध्ये स्त्रीचे आत्मभान, श्रमाचे मूल्य, सामाजिक प्रतिकार आणि आत्मसन्मान यांचे प्रभावी दर्शन घडते.

जनाबाईंनी श्रमाला प्रतिष्ठा दिली. कान्होपात्रांनी देहसत्तेविरोधी विद्रोह केला. सोयराबाईंनी जातीयतेविरोधात आवाज उठविला. मुक्ताबाईंनी वैचारिक विद्रोह व्यक्त केला. बहिणाबाईंनी स्त्रीजीवनातील अंतर्मनातील संघर्ष मांडला. या संत कवयित्रींचे साहित्य हे स्त्रीमुक्तीचे प्रारंभिक दस्तऐवज मानता येईल. त्यांचे बंड हे तलवारीचे नव्हते, ते शब्दांचे, आत्मसन्मानाचे आणि भक्तीचे बंड होते. म्हणून संत साहित्याचा अभ्यास केवळ धार्मिक साहित्य म्हणून न करता सामाजिक, सांस्कृतिक आणि स्त्रीवादी दृष्टिकोनातून करणे आवश्यक आहे.

**ग्रंथसंदर्भ सूची**


१. इनामदार, हे.वि. मराठी संत साहित्य. पुणे : स्नेहवर्धन प्रकाशन, २०१०.

२. तुळपुळे, शं.गो. संत वाङ्मयाचा सामाजिक अभ्यास. मुंबई : पॉप्युलर प्रकाशन, २००२.

३. साळुंखे, आ.ह. विद्रोही तुकाराम. सातारा : लोकायत प्रकाशन, १९९६.

४. साळुंखे, आ.ह. विद्रोही संत साहित्य आणि सामाजिक परिवर्तन. सातारा : लोकायत प्रकाशन, २००५.

५. देशमुख, उषा. मराठी संत कवयित्री. पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊस, २००८.

६. जोशी, का.अ. भारतीय स्त्री आणि संत साहित्य. पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन, २००१.

७. जोग, रा.श्री. मराठी वाङ्मयाचा इतिहास. पुणे : व्हीनस प्रकाशन, १९९७.

८. भालेराव, शंकर. वारकरी संप्रदाय : इतिहास आणि तत्त्वज्ञान. औरंगाबाद : विद्या बुक्स, २०१२.

९. जनाबाई. जनाबाई गाथा. संपा. रा.चिं. ढेरे. पुणे : पद्मगंधा प्रकाशन, २००४.

१०. कान्होपात्रा. कान्होपात्रा अभंग गाथा. पुणे : साहित्य प्रसार केंद्र, २००७.

११. बहिणाबाई. बहिणाबाई गाथा. पुणे : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, २००५.

१२. सोयराबाई. सोयराबाई अभंग संग्रह. मुंबई : साहित्य अकादमी, २००९.

१३. ढेरे, रा.चिं. महाराष्ट्राचा देव्हारा. पुणे : पद्मगंधा प्रकाशन, २०११.

१४. ढेरे, रा.चिं. संत साहित्य आणि लोकसंस्कृती. पुणे : पद्मगंधा प्रकाशन, २००३.

१५. भागवत, दुर्गा. संत साहित्य आणि समाज. मुंबई : मौज प्रकाशन, १९९८.

१६. पाटील, मालती. स्त्रीवादी साहित्य समीक्षा. कोल्हापूर : फडके प्रकाशन, २०१४.

१७. खरात, शरणकुमार. दलित साहित्य : आकलन आणि अभ्यास. पुणे : दिलीपराज प्रकाशन, २००८.

१८. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ. मराठी संत साहित्य कोश. मुंबई : महाराष्ट्र शासन, २०१०.

१९. कदम, वि.रा. भक्ती चळवळ आणि सामाजिक परिवर्तन. पुणे : डायमंड प्रकाशन, २०१३.

२०. कुलकर्णी, अ.रा. मध्ययुगीन महाराष्ट्र : समाज आणि संस्कृती. पुणे : डायमंड प्रकाशन, २००७.

**संदर्भ लेख** (Research Articles)

१. देशपांडे, मंगला. “संत जनाबाईंच्या अभंगांतील स्त्रीजाणीव.” साहित्य संशोधन पत्रिका, खंड १२, अंक २, २०१८, पृ. ४५–५८.

२. पाटील, स्वाती. “संत कान्होपात्रा : स्त्रीअस्मितेचा विद्रोही स्वर.” मराठी अभ्यास पत्रिका, खंड ८, अंक १, २०२०, पृ. ६७–७९.

३. जाधव, संगीता. “संत साहित्यातील स्त्रीवादी विचार.” संशोधन दीपिका, खंड ५, अंक ३, २०१९, पृ. २३–३६.

**इंटरनेट संदर्भ**

१. sahitya-akademi.gov.in

२. mskmandal.in

३. ignca.gov.in